# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Exam Godown Section**
SavitribaiPhule Pune University
Ganeshkhind Pune 7.
Contact : 020-25621462
Website: www.unipune.ac.in

परीक्षा गोदाम विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे ४११००७.
दूरध्वनी क्र.: ०२० २५६२१४६२
e-mail:godown@pun.unipune.ac.in

जा. क्र. पगो/२०२६/८६

दि. २२/०९/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था
(विद्यापीठ परीक्षांचे महाविद्यालयातील केंद्र)

**विषय :— हिवाळी सत्र परीक्षा ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२६ मधील आयोजित करावयाच्या विद्यापीठ परीक्षांसाठी आवश्यक साहित्यांच्या मागणीबाबत.....**

महोदय/महोदया,

वरील विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठ परीक्षा विभागाने हिवाळी सत्र ऑक्टोबर / नोव्हेंबर २०२६च्या परीक्षांसाठी आपणांस आवश्यक असलेल्या उत्तरपत्रिकांचे/स्टेशनरींचे वाटप करण्याचे प्रस्तावित आहे.

वरील परीक्षेच्या साहित्यांची मागणी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून ऑनलाईन पध्द्तीने ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत करावी. ऐनवेळी परीक्षेच्या साहित्याची मागणी केल्यास ती पुरविणे शक्य होणार नाही व अशा वेळी सदर परीक्षा साहित्य आपणांस विद्यापीठातून घेऊन जाण्याची व्यवस्था आपल्या महाविद्यालयामार्फत करावी लागेल, कृपया याची नोंद घ्यावी. तसेच परीक्षा गोदाम कक्षाने मान्य केलेल्या स्टेशनरी व्यतिरिक्त परीक्षा सुरू असताना अतिरिक्त स्टेशनरी लागल्यास ती देखील ऑनलाईन पध्द्तीनेच मागणी करावी. तरी दि. ३०/०९/२०२६ नंतर महाविद्यालयांनी ऑनलाईन पध्द्तीने स्टेशनरीची मागणी न दिल्यास त्यांना स्टेशनरी पुरविता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

उन्हाळी सत्र परीक्षा मार्च/एप्रिल २०२६ च्या विद्यापीठ परीक्षांच्या प्रात्यक्षिक उत्तरपत्रिकांचे गठठे गोदाम कक्षात आणून जमा करू नयेत. सर्व महाविद्यालयांनी प्रात्यक्षिक उत्तरपत्रिकांचे गठठे आपल्या महाविद्यालयातच परीक्षा विभागाच्या कस्टडीमध्ये ठेवावेत व विद्यापीठ प्रचलित नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी. सबब महाविद्यालयांनी हिवाळी सत्र ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२६ करीता ऑनलाईन स्टेशनरी मागणीपत्र भरताना ऑनलाईन पध्द्तीने फॉर्मनुसार माहिती अचुक भरणे आवश्यक आहे, याची सर्व महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

विद्यापीठ अधिकार मंडळाने निश्चित केल्यानुसार तसेच परीक्षांमध्ये राजेश अग्रवाल यांच्या शिफारशीनुसार व अनुषांगिक शासन निर्णयास अनुसरून सर्व विद्यापीठ अंतिम परीक्षांकरीता ६० ते १०० गुणांसाठी २४ पानी उत्तरपत्रिका, ३५/४०/५० गुणांसाठी १६ पानी उत्तरपत्रिकांचा वापर करणे बंधनकारक असून या सर्व परीक्षांना पुरवणी उत्तरपत्रिका देण्यात येऊ नयेत, याची कृपया आपल्या स्तरावर नोंद घेऊन कार्यवाही करण्यात यावी. यास्तव सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, त्यांच्याकडील सध्या शिल्लक असलेल्या उत्तरपत्रिका, सेंटीमीटर ग्राफ, ड्रॉईंगशीट यांचा पुर्णतः वापर होईल याची कृपया दक्षता घ्यावी.

ऑनलाईन पध्दतीने अंतिम / इनसेम परीक्षेसाठी उत्तरपत्रिका मागणी फॉर्म भरण्यासाठी आवश्यक सूचना:– https://examinward.unipune.ac.in/Godown/CollegeSide/Login.aspx

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1- | Examination | ⇨ | College Login | ⇨ | Stationary Requisition |
| 2- | College / Department Login | | | | |
| 3- | BCUD User Name | ⇨ | Password | ⇨ | Login |
| 4- | Available Stock Entry | | | ⇨ | Submit |
| 5- | Examination Stationary Requisition Application | | | | |
| 6- | Dashboard | ⇨ | Confirm the Application | | |

ऑनलाईन संपुर्णपणे माहिती भरलेल्या मागणीपत्राची प्रिंटआऊट झाल्यावर, त्या मागणी पत्रासोबत महाविद्यालयाने प्राचार्य/मान्यताप्राप्त संस्थेचे संचालक यांच्या स्वाक्षरीचे पत्र परीक्षा गोदाम विभागाकडे पाठविणे आवश्यक आहे. (पत्रामध्ये महाविद्यालयाचा पनकोड तसेच परीक्षा काम पाहणाऱ्या कर्मचाऱ्यांचा फोन नंबर लिहावा)

वरील नमूद केल्यानुसार परीक्षेच्या साधनसामुग्री बाबतची कार्यवाही करावी, ही विनंती.

कळावे

(डॉ. राजेंद्र तलवारे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ